
# प्रकरण पाचवे

## संत नामदेवांच्या आत्मचरित्रात्मक अभंगातील काव्य सौंदर्य आणि व्यक्तिमत्व वैशिष्टये



# प्रकरण पाचवे

# संत नामदेवांच्या आत्मचरित्रात्मक अभंगातील काव्यसौंदर्य आणि व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्ये

## १) संत नामदेवाचे आत्मचरित्रपर अभंग – 'मराठीतील पहिले आत्मचरित्र '

मराठी भाषेतले पहिले आणि उत्कृष्ट आत्मचरित्र कोणते याचा शोध घ्यायला गेल्यावर आपल्याला सातशे वर्ष मागे जायला लागते. समृद्ध मराठी भाषेच्या उगमस्थानीच आत्मचरित्राचा घाट असलेले चरित्र मराठी वाचकाला उपलब्ध व्हावे हेच फार भाग्याचे आहे. म्हणूनच मराठी भाषेतले पहिले आत्मचरित्रकार संत नामदेव हेच आहेत. असे स्पष्ट होते. संत नामदेवांची जी गाथा उपलब्ध आहे त्यात एकूण सुमारे २५०० अभंग आहेत. त्यांत आत्मचरित्रात्मक काही प्रकरणे आहेत. त्यातले श्री नामदेवचरित्र हे अत्यंत महत्त्वाच त्यात सुमारे सव्वातीनशे अभंग आहेत. त्यात पाठोपाठ येणारे आत्मचरित्रात्मक प्रकरण म्हणजे आत्मनिवेदन आणि आत्मज्ञानप्राप्ती. त्यात सुमारे चारशे अभंग आहेत. म्हणजे स्वतःचे चरित्र तर संत नामदेवांनी अभंगातून गुंफलेले आहेच पण आत्मनिवेदनात्मक अभंगातून आपल्या भक्तीची उंची जाणवून दिलेली आहे हे महत्त्वाचे त्याशिवाय नामदेवांनी संत ज्ञानेश्वरांचे चरित्र गुंफले आहे आणि संत ज्ञानेश्वर, सोपान, चांगदेव, मुक्ताबाई आणि निवृत्तिनाथ यांच्या समाध्यांचे जे वर्णन केले आहे हे सुद्धा त्यांच्या आत्मचरित्राचाच भाग आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही आत्मचरित्राच्या भागात जन्मापासून बऱ्याच मोठ्या वयापर्यंतचा पुष्कळ कालखंड प्रकट झालेली आहे.

आत्मचरित्र म्हटले की, जन्मापासूनचा प्रवास येतो. लहान वयातले संदर्भ आई वडिलांच्या आणि सभोवतीच्या वातावरणातील, संदर्भातून समजायला लागलेल्या वयात कळतात. पण जेव्हा समज येते, मनातल्या संवेदनांची नोंद व्हायला लागते तेथपासून आत्मचरित्रातल्या पानांना एक वेगळीच झळाळी प्राप्त होते. त्या दृष्टिकोनातून पाहिले की नामदेवांच्या आत्मनिवेदनात्मक अभंगातून एक सलग प्रवास कळतो,

अर्थात सातशे वषापूर्वी छपाईची कला अवगत नव्हती. पिढ्यान पिढ्या ह्या लिखाणांतून आणि पाठांतरातून हे संत वाङ्मय आपल्यापर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे नामदेवांच्या आत्मचरित्रातल्या सुरुवातीच्या नोंदीविषयक संशोधकांत एकमत नाही. त्याच्या जन्मविषयक नोंदी विषयकबाबत एकमत नाही. नामदेवांचा जन्म शिंपल्यात झाला म्हणजे अयोनीसंभवातून झाला येथपासून तो नामदेवांचा जन्म नरसी बामणी येथे झाला की, पंढरपुरात झाला येथपर्यंत अनेक प्रवाह आहेत. चंद्रभागेतून एक शिंपला वाहत आला. त्यात एक मूल सापडले या सर्व वास्तविक कवी कल्पना वाटतात. संत नामदेवांचा जन्म कार्तिक शुद्ध एकादशी शके ११९२ रोजी झाला इ. स. १२७० नामदेव हा शिंपी जातीत जन्माला आला. त्यांच्या वडिलांचे नाव होते दामाशेठी आणि आईचे नाव होते गोणाई नामदेवांनी स्वतःच्या चरित्राच्या सुरुवातीला दोन अभंग लिहिले आहे ते अतिशय महत्त्वाचे आहेत. कारण पहिल्या दोन अभंगातून नामदेवांचे संपूर्ण कूळ त्यांनी साक्षात उभे केले आहे.

१) "सिंपियाचे कुळी जन्म माझा जाला । परि हेतु गुंतला सदाशिवी ॥१॥
रात्रिमाजी सिवी दिवसामाजी सिवि । आराणूक जीवी नोहे कदा ॥२॥
सुई आणि सुतळी कात्री गज दोरा । मांडिला पसारा सदाशिवी ॥३॥
नामा म्हणे सिवी विठोबाची अंगी । म्हणोनियां जगी धन्य जालो ॥४॥" १) (अ. क्र. १२३२)

२) "कल्याणीचा सिंपी हरिभक्त गोमा । त्यांची कांता उमा नरहरिभजनी ॥१॥
सरिता सुकृताची त्या पोटी उत्पन्न । जाली संबोधन गोणाबाई ॥२॥
गोणाई दामासेठी जाले पाणीग्रहण । संसारी असोन नरसीगावी ॥३॥
गोत्र संता ऐका पूर्वजांची सहज । गाधिज भारव्दाज दोनीं कुळें ॥४॥
आऊबाई कन्या जाली गोणाईसी । पुढे देवा नवसी पुत्रासाठीं ॥५॥
नामा म्हणे होते विठोबाचे मनीं । तेचि नित्य जननी नवस करी ॥६॥" २) (अ. क्र. १२३३)

या त्यांच्या आत्मचरित्रातील पहिल्या दोन अभंगांतून त्यांनी आपल्या जन्माचा हवाला दिला आहे. विठोबाच्या

मनात जे होते. त्याचाच नवस गोणाईने म्हणजे नामदेवाच्या आईने केला असे नामदेवाने लिहून ठेवले आहे. हा अभंग फार महत्त्वाचा आहे. कारण गोणाईचे आणि श्री विठ्ठलाचे जे नामदेवावरून भांडण झाले त्याची किल्ली 'विठोबाचे मनी' ह्या दोन शब्दातून व्यक्त होते. पुढे पुढे नामदेव आपल्या जन्मपत्रिकेचा उल्लेख लगोलग करतात आणि तो अभंग नामदेवाचा जन्मकाळ निश्चित करायला मदत करतो. त्यात त्यांनी सविस्तर लिहिले आहे आणि त्याच अभंगावरून संत नामदेवांचा जन्मकाळ निश्चित धरला जातो तो अभंग असाः

"माझें जन्मपत्र बाबाजी ब्राम्हणें । लिहिले त्याची खुन ऐका ॥१॥

अधिक ब्याण्णव गणित अकराशतें । उगवता आर्दित्य रोहिणीसीं ॥२॥

शुक्ल एकादशी कार्तिक रविवार । प्रभव संवत्सर शालिवाहन शके ॥३॥

प्रसवली माता मज मळमुत्री । तेव्हा जिव्हेवरी लिहिले देवें ॥४॥

शतकोटी अभंग करील प्रतिज्ञा । नाम मंत्र खुणा वाचुनी पाहे ॥५॥

ऐंशी वर्षे आयुष्य पत्रिका प्रमाण । नामसंकीर्तन नामया वृद्धी ॥६॥"[३] अ.क्र १२४०

आता ह्या अभंगाच्या आधारे नामदेवाचे संपूर्ण आयुष्य तोलणे शक्य आहे. त्यावरूनच त्यांची जन्मतारीख विव्दान संशोधकांनी नक्की केलेली आहे. त्या जन्मपत्रिकेप्रमाणे नामदेवाचे आयुष्य ८० वर्षाचे नक्की केलेले आहे. त्याप्रमाणे संत नामदेवांचा समाधिकाळ आषाढ वद्य त्रयोदशी शके १२७२ म्हणजे इ.स. १३५० असा आहे. संत ज्ञानेश्वरांनी शके १२१८ साली समाधी घेतली त्यावेळी नामदेवांचे वय २६ –२७ वर्षाचे होते. त्यानंतर संत नामदेवांची आयुमर्यादाकाळ ५४ वर्षाचा आहे. हा काळ फार महत्त्वाचा आहे. याच कालावधीत संत नामदेवांनी शतकोटी अभंगाची प्रतिज्ञा केलीयचा अर्थ हा खूप अभंगरचना असा आहे. कारण आज संत नामदेवाचे सुमारे २५०० अभंग उपलब्ध असले तरी प्रत्यक्षात त्याहून नक्कीच जास्त असणार पण काळाच्या ओघात हस्तलिखित वाहून गेल्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच लोकांच्या तोंडी असलेले अभंगही कदाचित नाहीसे झाले असतील.पण संत नामदेवांच्या उपलब्ध गाथेवरून

नुसती नजर फिरवली तरी त्या भाषेच्या सौंदर्याचे खरोखरच आश्चर्य वाटते. पुन्हा ज्ञानदेव आणि नामदेव समकाळात असूनही दोघांच्या रचनेत खुप फरक जाणवतो. मराठी भाषेच्या आंरभबिंदूला एवढी ऐश्वर्य संपन्न भाषा निर्माण कशी झाली ह्याचे कुतूहल अजून संपलेले नाही. संत ज्ञानेश्वरांची नामदेवांची, समग्र संतवाङमयाची भाषा अतिशय संपन्न आहे. सोपी व काळजाला भिडणारी आहे. एखाद्या ग्रंथाप्रमाणे अभंगरचना सलग नसते. कारण प्रत्येक अभंग हा आपली स्वतंत्र नाममुद्रा घेऊन निर्माण होतो. त्यामुळे त्याचे आत्मचरित्र हे कदाचित कीर्तनातून फुलले असावे असे वाटते. कीर्तन हा प्रकारच मुळी अतिशय रसाळ असतो. प्रासादिक असतो. कदाचित कीर्तनात लोकांच्या आग्रहावरून त्यांनी स्वतःची कहाणी सांगितली असावी. त्यामुळेही कदाचित त्या रचनेला काहीच सुसूत्रता लाभली नसावा म्हटलं तर प्रत्येक अभंग स्वतंत्र म्हणूनही आत्मचरित्राच्या खाणाखुणा सांगतो. पण प्रसंग सलग वाचले तर कहाणीचा आनंदही हा अभंग कालखंड देतो हे वाचताना जाणवते. त्या आत्मचरित्रातून केवळ नामदेव उभा राहत नाही तर संपूर्ण संतमेळावा उभा राहतो. केवळ नामदेवाचे कुटुंबीय उभे राहत नाहीत, तर संपूर्ण तेराव्या आणि चौदाव्या शतकाचा पूर्वार्ध जाणवत राहतो. त्यामुळे संत नामदेवांचे अभंग हे सुप्रसिद्ध असून त्या अभंगामुळे सर्वात मोठे उपकार मराठी भाषेवर झाले आहेत कारण हे अभंग मराठी भाषेत आहेत.

ह्या लघुप्रबंधाचा विषय 'संत नामदेवांच्या अभंगातून व्यक्त झालेले आत्मचरित्र' असा आहे. कारण आत्मचरित्र हा आर्वाचीत कालखंडातील वाङमय प्रकार असला तरी प्राचीन कालखंडातील मराठी वाङमयातील हे पहिले आत्मचरित्र आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे नामदेवांने शिंपी कुळात जन्म घेतला, निवृत्ती ज्ञानदेवादि भावंडाबरोबर आणि इतर संतांच्या बरोबरीने भागवत धर्माची ध्वजा फडकावली, हजारो अभंग लिहून त्या काळच्या जनजीवनाचे आणि लोकांच्या एकूण व्यवहाराचे प्रभावी भाषेत पण सहज सोप्या शैलीत वर्णन केले. श्री विठ्ठलाचे वेड शेवटपर्यंत टिकवले. या अभंगलेखनाने त्यांचे तरणारे अभंग झाले, धर्माची ध्वजा स्वतःच्या खाद्यावर घेऊन संत नामदेव थेट पंजाबपर्यंत गेले आणि संपूर्ण देश भटकून प्रदीर्घ भारत तीर्थयात्रा केली. भागवत धर्माची पताका सगळीकडे फडकावून भक्तिमार्गाचा विस्तार केला.

हे संत नामदेवांचे अलौकिक महत्त्व कार्य होय. संत नामदेव मृत्यूसमयी श्री विठ्ठलाचे पायापाशी आले. हा संत नामदेवांच्या आयुष्याचा प्रवासच्या त्यात विपूल घटना आहेत. पण श्री विठ्ठलाशी जडलेले त्यांचे नाते हा केवळ धर्माच कसोटीवरच चमकून उठणारा चमत्कार नसून, संसाराच्या जाळणाऱ्या दुःखमय होळीत स्वतःला जाळून न घेता त्यापासून अलिप्त राहून प्रचंड भक्तीच्या जोरावर श्री विठ्ठल भक्तीचा प्रसार सर्वत्र पसरविला. संत नामदेवांनी लहानपणी विठ्ठलाला आग्रह करून नैवद्य खायला लावला याचेवर्णन त्यांनी स्वतःच करून ठेवले आहे. त्यांचे मडके अजून कच्चे कसे आहे आणि त्यांना गुरूची साथ कशी मिळायला हवी हे गोरोबा कुंभार प्रकरण त्यांच्या या आत्मचरित्रात आहेच. नामदेवांची साधकावस्था ईश्वरदर्शनाची उत्कंठा आणि विठ्ठलाला साद घालण्याची त्यांची रोखठोक पद्धत पाहून मन भरून येते.

आध्यामिक उन्नतीचे संत नामदेवांचे चरित्र हे असे विविध मार्गाने फुलले आहे. आख्यायिकांच्या विळख्यात ते सापडलेले आहे. पण आत्मचरित्रातून ते इतके प्रांजळपणे व्यक्त झाले आहे की, वाटतं आत्मचरित्र हे नामदेवांनी लिहिले तसे ते प्रांजळच आहे कारण सामाजिक, सांस्कृतिक काळाशी संबधित असे हे आत्मचरित्र प्रकरण आहे. त्याची गोडी वाचाल तशी वाढत जाते. संत नामदेवांच्या भाषेत किती कमालीचा जिव्हाळा आहे. किती रसाळता, पटकन मिळून जाणारा आणि प्रसंग जिवंत करण्याची ताकद असलेला आत्मानुभवी संत आहे. निर्व्याज प्रेमाची अतूट व्याख्या करायची झाली तर नामदेवांचा आधार घ्यायला हवा. प्रेमाचे अुत्तुंग टोक, नामदेवाच्या आत्मचरित्रातून अत्यंत प्रभावीपणे प्रकट होते. महाराष्ट्रातील तेराव्या शतकातील संतस्वरूप आणि त्याची सामाजिक फलश्रुती ही संत नामदेवांच्या आत्मचरित्रातून स्पष्ट होते. म्हणूनच संत नामदेवांचे अभंग हे सातशे वर्षापासून सुप्रसिद्ध आहेत.

संत नामदेवांच्या ठिकाणी प्रखर वैराग्य नांदत होते. याची साक्ष या आत्मचारित्रात्मक लिखाणातून जाणवते. गोणाईने नामदेवाने संसारात परत यावे म्हणून खूप प्रयत्न केले. खुद्द विठोबाशी हुज्जत घातली. पण नामदेव श्री विठ्ठल प्रेमाच्या बाबतीत तसूभरही ढळले नाहीत. "देह जावो, अथवा राहो " ही त्यांची भूमिका होती. म्हणूनच सातशे वर्षे झाली, नामदेवांचे चारित्र्य, वाङ्मय, निष्ठा ही अक्षुण्ण राहिली. म्हणूनच

मराठीतले पहिले अर्त आत्मचरित्र म्हणून संत नामदेवांच्या आत्मचरित्राकडे पाहता येते. प्रत्येक शब्द प्रत्येक श्वास विठोबाच्या नावावर करणारा असा हा संत आणि त्यांचे हे आत्मचरित्र जागतिक वाङ्मयातही नक्कीच श्रेष्ठ मानले जाते, म्हणूनच प्राचीन मराठी साहित्यातील संत नामदेवांच्या अभंगातून व्यक्त झालेले हे पहिले आत्मचरित्र होय.

## २) प्रासादिक भाषेतून प्रगटलेली रस व अलंकार सृष्टी

संत नामदेववादि संतांचे काव्य परतत्त्वाला स्पर्श करणारे आहे. आपल्या आध्यात्मिक वस्तूशी संतजन एकरूप झाले आणि त्या समस्यतील सौंदर्य व्यक्त करण्याचे काव्य हे सुलभ सोपे साधत आहे, एवढ्याच दृष्टीने त्यांनी काव्य रचना केली. कीर्तनाच्या रंगात नाचून जगी ज्ञानदीप लावण्याची प्रतिज्ञा करणारे संत नामदेव अभंग लिहितात ते परमार्थ प्रीतीनेच संतांचे काव्य हे त्यांच्या आध्यात्मिक अनुभूतीचा अपूर्व आविष्कार आहे. सामाजिक किंवा वाङ्मयीन प्रयोजनानी उद्युक्त होऊन संतांनी काव्य केले नसून, पारमार्थिक उद्दिष्टांनी प्रेरित होऊन, परतत्त्वात स्पर्श झालेले आपले जीवन त्यांनी काव्यात प्रतिबिंबित केले. ब्रह्म रसाचा स्वाद बरोबर असलेला काव्यनंद लुटण्यासाठी त्यांनी पद्यरचना केली नसून, ब्रह्मस्वादाच्याच अलौकिक आनंदाने हरवून जाऊन त्यांनी आत्मविष्कार केला. हा विवेक बाळगूनच संत नामदेवांच्या अभंगवाणीचे काव्यदृष्ट्या समीक्षण करावयाचे आहे. नामदेवांनी आपल्या अभंगरचनेत स्वतःच्या अध्यात्मक जीवनाचा आलेखच काढला आहे. उत्कृष्ट भावकाव्याला आवश्यक असलेले उत्कटता, रसवत्ता, प्रसाद इत्यादि गुण त्यांच्या अभंगात सहज आलेले असल्यामुळे त्यांची आत्मपर रचना अभिजात काव्याच्या कसोटीस उतरते.

काव्यनिर्मितीस कारणीभूत असलेली कवीची प्रतिभा त्या प्रतिभेस साहय्य देणारी कवीची व्युत्पन्नता आणि त्याचे परिश्रम ही तीन काव्यकारणे आपल्याकडील साहित्यशास्त्रकारांनी सांगितलेली आहेत. त्याबरोबरच उत्कट भावनात्मकता हा आणखी एक गुण काव्योत्पत्तीस आवश्यक आहे. त्याप्रमाणे संतनामदेवांच्या अभंगवाणीतील प्रतिमा, म्हणजे अपूर्व वस्तुनिर्मिती करणारी प्रज्ञा म्हणजे प्रतिभा होय. काव्यातील स्वभावलेखन,

कथावस्तू कल्पनाविलास, रचनासौंदर्य इत्यादि गोष्टींचा समावेश वस्तुनिर्मिती या कल्पनेत होतो. बाळक्रीडा, या प्रकरणातील अनेक लहान मोठी कथानके, शिवरात्र महात्म्य, पौराणिक चरित्रे, ज्ञानेश्वरांची आदि, तीर्थवळी व समाधि अशा विविध कथाभागांतून नामदेवांच्या प्रतिभाविलासाची अपूर्वाई जाणवते. या दृष्टीने नामदेवांच्या लेखणीतून उतरलेली पुढील सुभाषिते लक्षणीय आहेत.

"वैकुंठासि सिडी लावियेली ।' 'अंकुरला गाभा विराटाचा'

'ज्ञानदीप लावू जगीं । भोगावरी आम्ही घातला पाषाण '

या अर्थबहुल, सरस व रमणीय काव्यपंक्तीमधून नामदेवांच्या प्रातिभिक शलाका प्रभावीतपणे दिसून येतात. त्यांच्या कल्पनाशक्तीची स्वतंत्रता व अपूर्वता त्यांतून विशेष जाणवते. अशारीतीने प्राचीन साहित्यज्ञांनी प्रतिभाशक्तीविषयी विविध स्तरांवरील ज्या कल्पना मांडल्या आहेत, त्यांचे यथारूप दर्शन नामदेवांच्या काव्यसंपदेत स्पष्टपणे घडते. प्रतिभेच्या खालोखाल 'व्युत्पन्नता' हा गुण सांगितला आहे. हा त्यांच्या अभंगात जाणवतो. त्यांच्या अभंगरचनेत त्यांनी कमीत कमी सव्वीस तरी पौराणिक कथांचे निर्देश केले आहेत ते त्यांच्या बहुश्रुततेचे द्योतक आहे.

'नव्हे बहुश्रुत नव्हे ज्ञानशील । दास मी दुर्बल वैष्णवांचा ॥'

'कळावंताच्या कळाकुसरी । त्या मी नेणे गा श्रीहरी ॥'

सरस अभंगरचनेसाठी व्युत्पन्नतेची आवश्यकताच नाही असा त्यांचा दृष्टिकोन आहे. भक्तिभावाची सरळता पांडित्याने बिघडते, ज्ञानवृद्धीही जीवितातील काव्याला हानिकारक ठरते, हे आजही मांडले जाणारे मत संत नामदेवांच्या काव्योद्‌गारातून प्रतीत होते. संत नामदेवास पुस्तकी पांडित्याचा संपर्क झाला नव्हता, त्यामुळे त्यांच्या काव्यात तांत्रिक बारकावा किंवा तर्क कर्कशता नाही.

साहित्यशास्त्रज्ञांनी सांगितलेले तिसरे काव्यकारण म्हणजे 'परिश्रम' किंवा स्वतंत्र अभ्यास होय. काव्यनिर्मिती आणि काव्य चर्चा करण्यास जे समर्थ आहेत. अशा लोकांजवळ याचा अभ्यास करावयाचा असतो. यात मुख्यतः बाह्यांग आणि अंतरंग महत्त्वाचे असते. संत नामदेवांच्या कवित्त्वात फारसे

संस्कारण नाही. कलेत अभिजाततेच्या खालोखाल संस्काराला महत्त्व असते. त्यांच्या मुखातून भावनावेगामुळे जे उद्‌गार बाहेर पडले, त्यांनाच त्यांनी काव्यरूप दिले. नामदेवांचे गुरू विसोबा खेचर यांनी त्यांस उपदेश केला. 'डोळियांचे डोळे उघडिले जेणे ।' 'तेणें नामा कैसा उपदेशिला ' 'निज वस्तू दाविली माझी मज ।' पण विसोबांकडून नामदेवांस काव्यप्रेरणा मिळाल्याचा कुठेही निर्देश आढळत नाही. मात्र "संत ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेने नामदेवादि भक्तांना कवित्त्वाची प्रेरणा तशीच कीर्तनाची स्फूर्ती दिली" हे म्हणणे मान्य होण्यासारखे आहे.

वरील तिन्ही कारणांपेक्षा संत नामदेवांच्या दृष्टीने अधिक महत्वाचे कारण म्हणजे त्यांची उत्कट 'भावनात्मकता' प्रतिभेलाही काव्यरूप पावण्यास भावसमाधीची जरूरी असत. मनुष्य हे भावनांचे एक गोठोर्डेच असतो.

'हासे नाचे प्रेम फुंदतु, डुल्लतु । अहर्निशी गातू नाम तुझें '

'प्रेमपिसें भरलें अंगी' । गीतसंगें नाचो रंगीं ॥'

या उल्लेखावरून नामदेवांचे काव्य मुख्यतः भावनांकित व भावोत्कट होते हे स्पष्ट होते. काव्यनिर्मितीमागील या प्रमुख कारणांशिवाय उत्प्रेक्षा, अपूर्व कल्पना शक्ती, ग्रहणधारणा, स्मरण आदि अनेक कारणें साहित्यतज्ञांनी दिली आहेत. साहित्यशास्त्रीय काव्यकल्पना आणि नामदेवादि संताच्या काव्यकल्पना यात पुष्कळच भेद आहे. त्यांचे काव्य हे नेणीवेंतील काव्य आहे. संत नामदेव आपल्या अभंगात म्हणतात,

'कोणे वेळे काय गार्णे हे तो भगवंता मी नेणें ॥'

'वारा वाजे भलतया । तैसी माझी रंग छाया ॥'

'टाळमृदुंग दक्षिणेकडे । माझे गार्णे पश्चिमेकडे ॥'

साहित्यामध्ये काव्य निर्मितीचे अनेक हेतू आहेत. यश, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, अशुभनिवारण, उदात्त आनंद, आणि रोचक उपदेश अशी प्रयोजने मम्मटाने सांगितली आहेत. पण नामदेवादि संतांच्या काव्यात ही लौकिक प्रयोजने संभवत नाहीत पण उदात्त आनंद, रोचक उपदेश व अशुभनिवारण हे हेतू

मात्र त्यांच्या अभंगरचनेमागे आहेत.

संत नामदेवांना सगुणोपासनेचा छंद लागला होता. विटेवरचे ते सावळे परब्रह्म भेटल्यामुळे झालेलया 'अपूर्व आनंदाचा' उल्लेख त्यांनी अनेक ठिकाणी केला आहे 'सुखाचे हे सुख श्रीहरीमुख । पाहतांही भूक ताहान गेली ।।'

'सुखाचा सोहळा वाटतसे जीवा । भेटणें केशवालागी आजी ।।'

'माझें सुख मज दाखविलें डोळां । दिधली प्रेमकळा नाममुद्रा ।।'

यातून उदात आनंदाचा प्रत्यय संत नामदेवांना येतो. त्याचप्रमाणे भक्तिस्तोम माजविणाऱ्या वेषधाऱ्यांस उपदेश, खलदुर्जनास उपदेश, मुमुक्षूंस उपदेश व मनासउपदेश, जनास उपदेश, इत्यादि गाथेतील प्रकरणातून उपदेशपर विचार दर्शन घडते. त्यानंतर नाममहिमा व संतमहिमा गातांना आणि शिवरात्र महात्म्य व तुळशी महात्म्य सांगतांना नामदेवांनी त्यांपासून होणारे अशुभाचे निवारणही वर्णिले आहे. त्यामुळे प्रपंचाचे बिरडे तुटेल, चंद्रभागेत स्नान केल्याने यमलोकापासुन सुटका होईल, हरिनामाचा छंद लागल्याने मायाजाळ तुटेल असे अनेक उल्लेख त्यांच्या अभंगात आढळतात.

संत नामदेवांच्या काव्यांतून घडणारे हेतूदर्शन अपुरे असले तरी रूढीने ठरवून दिलेली व महत्त्वाची अशी फारच थोडी काव्योद्दिष्ट त्यांच्या अभंगावाणीत आढळता. कवित्व लेखन करताना संत ज्ञानेश्वरांच्या पुढे लोकोद्धाराचे ध्येय होते. लोकांना श्रवणसुखमिळावे म्हणून ते प्रमेयांच्या जोडीने वाक्यचातुर्याचा उपयोग करतात. पण नामदेवांच्या कवित्वाचा मुख्य उद्देश विठ्ठलाला वश करण्याचा आहे, म्हणूनच 'बोलू ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले ।' असे ते म्हणतात हरिनामाचा महिमा गावा, भक्ती वाढवावी आणि हरिदासांना आकल्प आयुष्य व संतमंडळीस सुख चिंतावे, याशिवाय अन्य हेतू मनात ठेवून नामदेवांनी ग्रंथ रचना केली नाही. नामदेवांच्या अभंगाचा रोख निव्वळ तत्त्वज्ञान सांगण्यापेक्षा भक्ती वाढविण्याकडे जास्त आहे. या भक्तिभावाच्या आविष्कारासाठीच,

"वाकडे तिकडे जैसे आलें तैसे । गावाया उल्हास उगवला ।।" असे संत नामदेवांनी म्हटले आहे.

संत नामदेवांच्या काव्याचे स्वरूप ठरविताना बाह्यांग व अंतरंग या दोन्ही दृष्टीने त्यांच्या काव्याचा विचार महत्त्वाचा आहे.

१) चरित्रपर – बालक्रीडा, ज्ञानेश्वर चरित्र, (आदि, तीर्थावाळी, समाधि), पौराणिक चरित्रे, (श्रीयाळ, प्रल्हाद इ.) संतचरित्रे (चोखोबा, राका इ.)

२) आत्मचरित्रपर – लौकिक जीवनवृत्त (जन्म, कुळकथा, कुटुंबजीवन इ.) आध्यात्मजीवन वृत्त (गुरूपदेश, आत्मसुख, भक्ती इ.)

३) उपदेशपर – भक्तिस्तोत्र माजविणाऱ्यांस उपदेश, अन्यदैवतोपकांस उपदेश, खलदुर्जनास उपदेश, जनास उपदेश, मनास उपदेश, मुमुक्षूस उपदेश,

४) वर्णनपर – नाममहिमा, संतमहिमा, इ. श्रीराम महात्म्य, तुळशीमहात्म्य, दशावतार, नरकोद्धार, इ.

५) स्फुटरचना – काकड आरती, शेजारर्ती इ.

याशिवाय नामदेवांच्या हिंदी पद्यरचनेचाही एक स्वतंत्र विभाग मानला आहे. त्याचप्रमाणे संत नामदेवांचे कवित्व हे त्यांचे प्रकट चिंतन आहे. मनास उपदेश, आत्मसुख प्राप्तीविषयी आर्तोद्‌गार इत्यादि प्रकरणातून त्यांची चिंतनशीलता प्रकर्षाने प्रत्ययास येते. ४)

**रसविचार :–**

संत नामदेवांची अभंगरचना रससिद्ध आहे. त्याबद्‌दल त्यांच्या समकालीन संत मंडळींनीही त्यांचे काव्य रसात्मक असल्याची ग्वाही दिली आहे.

''सिधूहूनि सखोल सरस तुझे बोल । आनंदाची ओळ नित्यनवी ''

(संत ज्ञानेश्वर)

''परि नामयाचे बोलणे नव्हे रे कवित्व । हा रस अद्‌भूत निरूपम''

(संत ज्ञानेश्वर)

''दुधावरील साय तें मी बाणूं काय । तैसे गाणे गाय नामदेव ॥

( परिसा भागवत )

**"तैसे रसाळ अमृत नामयाचे गीत ।"**

( परिसा भागवत )

याप्रमाणे संत नामदेवांच्या काव्यात विविध रसांचा अविष्कार स्पष्ट झालेला दिसतो.

**१)भक्ती** :– संतनामदेवांच्या कवित्वात भक्तिरस हा प्रामुख्याने दिसतो. भक्तिरसाला भरताच्या रसव्यवस्थेंत स्थान नव्हते पण रूपगोस्वामी आणि मधुसूदन सरस्वती यांनी भक्तिरसाला रसमालिकेत केवळ स्थानच नव्हे , तर प्राधान्य दिले. काव्यात भक्तिभावना उत्कटपणे व्यक्त होऊ शकते आणि वाचकाला ती आस्वाद देऊ शकते. शरणागती ही मुलभूत प्रवृत्ती भक्तीला आधार होऊ शकते. तिचा प्रबळ भावबंध होऊ शकतो. अष्टसात्त्विक भावनांनाही तीमध्ये स्थान आहे. तिची आल्हादादायी आस्वाद्यता लक्षात घेता नुसती रसपदवीच काय, पण रसराज्ञीपदही देण्यास प्रत्यवाय नाही. संत नामदेवांची अभंगवाणी म्हणजे भक्तरसाची मंदाकिनी आहे. उत्कट प्रेमभक्तीचे उदा. सांगावयाचे झाल्यास, 'यथा नामदेवस्य' असेच म्हणावे लागेल. "मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिषें । तुझे दारी वसे ऐसे करी ।" ऐवढेच त्यांचे मागणे आहे. 'एक तुळशीदल पुरे ।' अशी त्यांची अल्पसंतुष्ट वृति आहे, 'करवे पान अंगणी उभे उभे भोजन मागे रामनाम॥' यातून व्यक्त झालेली नामदेवांची पायरी परमार्थाने बरीच वरची आहे. नामदेवांच्या प्रेमळपणात याचकाची आर्तता, लेकराचा लडिवाळपणा आणि चातकाची अनन्यता आहे. त्यांच्या अभंगरचनेतील अनेक स्थळी भक्तिरस आणि वत्सलरस एकमेकात मिसळून गेले आहेत. 'पाजि प्रेमपान्हा पांडुरंगे ।' किंवा 'विठाई माऊली कृपेची कोवळी ।' अशी अनेक उदाहरणे त्यांच्या काव्यात आढळतात.

भक्तितत्त्वारील अनन्यनिष्ठ हा नामदवांच्या जीवनाप्रमाणे त्यांच्या कवित्वाचाही एकमेव विषय आहे. भक्तिरसाच्या संदर्भात, स्वेद, स्तंभ, कंप, रोमांच, स्वरभेद, वैवर्ण्य, अश्रू आणि प्रलय या अष्टसात्त्विक भावांचा निर्देश केला जातो. या भावांनी भावनेचे सामर्थ्य विशेषत्वाने व्यक्त होते. कीर्तन समयी प्रत्यक्ष अभंग गायन करताना त्यांचा आविष्कार होणे सहाजिकच आहे. पण आपल्या काव्यरचनेतही त्यांतील

काही भावांच्या अनुभूतीचा निर्देश संत नामदेवांनी केला आहे, हे विशेष होय.

"पुलक धर्म रोमांच नाही जप उठले । सजळ नाही झाले नयन जव ।

हरिभक्तीचे सुख कळले जे म्हणती ।लटिके बोलिजे ती उभय लोकी ।।"

आत्मसुख प्राप्ती विषयी आर्तोद्गार या प्रकरणात संत नामदेवांनी श्रवण कीर्तन अर्चनादि नवविधा भक्तीच्या निरूपणासाठी दोनशेहून अधिक अभंग वेचले आहेत. त्यांतील भक्तीभावनेची आर्तता करुणरम्य आहे. त्यातच संत नामदेवांच्या आत्मचरित्राचे भावसौंदर्य सामावले आहे. अलिकडच्या काळातील आत्मचरित्राचे जे महत्त्व ते संताच्या साहित्यात आत्मसुखाच्या बाबतीत दिसून येते. म्हणूनच संत नामदेवांनी भक्तिरसाची अनेक उदाहरणे आपल्या अभंगात व्यक्त केली आहेत.

"अमृताहुनी गोड नामा तुझे देवा ।"

"डोळे शिणले पाहता वाटुली ।।" तुझे प्रेम माझ्या हृदया आवडी ।"

"केधवा भेटसी माझिया जिवलगा ।" भेटीलागी माझा फुटतसे प्राण ।"

"आरूष सावडे नेणे काही वेडे ।" पंढरीचा वास चंद्रभागे स्नान ।"

"स्फुंदत स्फुंदत नामा उभा व्दारी ।"

या भक्तिभावाच्या उत्कटतेस तोड नाही. तसेच त्यास दुसऱ्या कोणत्याही भावनेचा स्पर्श नाही. हा एकपिंडी आविष्कार आहे.

**२) करुणरस :-** वत्सल रसाप्रमाणे करुण रसही नामदेवांच्या अनेक भक्तिरसयुक्त अभंगात मिसळून गेला आहे. विशेषतः संत ज्ञानेश्वरांची समाधि या प्रकरणांतील करुणरसाविष्कार हृदयस्पर्शी वाटतो. ज्ञानराज ब्रह्मी मिळाल्यानंतर बांधल्या तळ्याचा पाट फुटून बारा वाटांनी ओघ वाहवेत किंवा हरिणीवाचून खोप ओस पडल्यावर पाडसे दशदिशांना भ्रमावीत, तशी संतजनांची दयनीय दशा झाली.

"नामा म्हणे देवा घार गेली उडोन । बाळे दानादान पडियेली ।।"

करूण रसाचे दुसरे उत्कृष्ट उदाहरण शिवरात्र महात्म्य या प्रकरणात आढळते व्याधाने हरिणाला मारण्यासाठी

शर रोखल्यानंतर हरिणाने मोठाच शोक केला.

"कपाळी कपाळ लावी चुंबे रडे । आक्रंदोनि पडे पृथ्वीवरी ।।
आवडीचे चिन्ह सांगवेना वाचे । जाणावे जयांचे ज्याचे त्यानी ।।'
मानेवरी मान टाकूनि राहिली । वाचा ही खुंटली बोलवेना ।।"

अशाप्रकारे संत नामदेवांच्या काव्यकर्तृत्वातून त्यांच्या अभंगातील रसवर्णन स्पष्ट होताना दिसते. हे त्यांच्या आत्मचरित्राचे सौंदर्य आहे.

**३) हास्यरस :–** नामदेव गाथ्यात हास्यरसाचा अविष्कार तुरळकपणे झाला आहे. नामदेवांचा 'बोबडा' म्हणजे हास्याचे रमणीय उदाहरण आहे. बाळकृष्णांच्या एका भाबड्या सवंगड्याने केलेले आत्मनिवेदन हे या काव्याचे विषय–वैशिष्ट्य आहे. इतर मित्रमंडळींच्या मानाने आपापल्या गाई राखण्याचे काम तेवढे खूप करावे लागते, पण खरवसाची वाटणी करताना मात्र आपल्यावरच नेमका अन्याय होतो म्हणून कृष्णावर रुसलेला हा त्याचा बालमित्र म्हणतो –

"कुला थमाल ले थमाल आपुल्या गाई ।
आम्ही आपुल्या घलासि जातो भाई ।।"

या सवंगड्याचा बोबडपणा त्यांची निरागस वृत्ती, त्याचा सात्त्विक संताप आणि अखेरीस "तू म्हनशिल ले याला कळतचि नाही ।" हा भोळाभाबडा आत्मसंतोष या साऱ्या तपशीलाच्या अद्‌भुत समीलनातून हास्यरसोत्पत्तीचे अपूर्व वातावरण उत्पन्न होते. उपरोध व उपहास हे हास्याचे उपप्रकारही या काव्यात पाहावयास मिळतात.

'तू भक्त निधडा आणि हा देव धडफुडा । छानमेळ जमला आहे दोघांचा ।" ही गोणाईची नामदेवाविषयीची उपरोधपूर्ण तक्रार आहे आणि "अवघे भांबडभूत होऊन घरांत आनंदाने नाचत असतात ।" ही राजाईने तिला जोडलेली पुस्ती म्हणजे उपहासपूर्ण थट्टा आहे. तसेच कृतकसंन्यस्तपणाची थट्टा करताना, "मांजराचे गेले डोळे । उंदीर देखोनि तळमळे ।" असा संयत शब्दांतील उपहास संत नामदेवांच्या वाणीतून प्रकट झाला

आहे.

**४) बीभत्स :–** संततुकारामांच्या मानाने संतनामदेवांनी बीभत्सरस फारच थोडा राबविला आहे. संबध गाथेत त्याची तीन चार उदाहरणे असतील. माणूस म्हातारा झाला की तो सर्वानाच भारभूत होतो आणि लोक त्याची टवाळी करतात.

> "म्हणती म्हातारा बैलदृष्टी । कैसा अक्षय झाला गे ।।
> खोकलियासी येतसे खंकारा । म्हणती रांड्चा म्हातारा ।।
> अझूनि न जाय मरण व्दारा । किती दिवस चालेल ।।"

आज समाजात वृद्धाश्रम व्यवस्था सुरू झाली आहे याचे वर्णन सातशे वर्षापूर्वी संत नामदेवांनी आपल्या गाथ्यात केले आहे. यातून हा बीभत्सरस स्पष्ट होतो. (त्यानंतर त्यांनी भक्तीचे स्तोत्र माजविणाऱ्याचे ही बीभत्स रसातून केले आहे) बीभत्स रसाची उदाहरणे अशी अल्पमात्रच आहेत. पण नामदेवांचा अभंग गाथा ही मुख्यतः त्याची "भक्तीची गीता" आहे अंतरीची आर्तभक्ती व्यक्त करण्यासाठी नामदेवांचे बहुतेक काव्य अवतरले आहे. रसाच्या विविधतेपेक्षा एकाच भक्तिरसाचा प्रकर्ष येथे आढळतो. खुद्द नामदेवांनाही त्याची जाणिव आहे, असे मला वाटते.

> "नव्हे हे प्राकृत पाठांतर कवित्व ।
> हा उपनिषद मथितार्थ ब्रह्मरस ।।"

संत नामदेवांचे हे म्हणणे सर्वस्वी मान्य होण्याजोगे आहे.

## ☯ अलंकारसौंदर्य

नामयाची वाणी सहजसुंदर आहे. तिला अलंकरणाची फारशी हौस नाही व जरूरीही नाही. तरी पण उत्कट भावनाविष्काराच्या आवेगात आलेली संयत आलंकारिकता या वाणीस शोभा देते. अलंकार हे काव्याचे गुण आहेत. हे गुण स्थिर स्वरूपाचे नसतात. त्यांच्या उपयोगामुळे शब्दार्थाला शोभा येते. काव्यातील त्यांचे स्थान तत्त्वतः गौण असते. व्यवहारांतील अलंकाराप्रमाणे काव्यगत अलंकारांचाही विलक्षणपणे केलेला उपयोग

सौदर्याला उपकारक ठरतो. यमकानुप्रासादि शब्दालंकार आणि उपमारूपकादि अर्थलंकार असे अलंकाराचे दोन वर्ग आहेत. नामदेवगाथेतील त्यांचे दर्शन सौम्य व योग्य आहे. तसेच त्याच्या आत्मचरित्रपर अभंगातूनही त्यांचे वर्णन आलेले आहे.

१) अनुप्रास :– 'केशवकैवल्य कृपाळु' 'नामा म्हणे सुरस सेवी सुधारस,' 'भक्त भागवत भाग्याचे' 'विटली मावळती मनोधर्म,' 'संतसमागमे साधी हे साधन'। विठोबा जिवेसि जडला जाण। अशी अनुप्रासाची अनेक सुंदर उदाहरण संत, नामदेवांच्या काव्यात त्यांच्या आंतरिक भावनेतून उमटलेली दिसतात.

२) यमक :– यमकामुळे गेयतेत भर पडते, आणि नामदेवांच्या भावकतितेत गेयतेचे महत्त्व अधिक आहे. दामयमक, पुष्पयमक, इत्यादि कसरतींच्या ऐवजी नेहमीचे अंत्ययमक येथे आढळते. 'वारा धावे भलतया ठायां । तैसी माझी रंगछाय॥'

३) श्लेष :– व्यक्तिनामांवर कोटी करण्याची हौस नामदेवांनी क्वचित स्थळी व्यक्त केली आहे. उदाहरणार्थ –

"नामा म्हणे हरिकथा हरिभवव्यथा ।'

उद्धरसी सर्वथा भाक माझी ॥ " (५)

"मुक्ताबाई मुक्त केली केशवराजें ।"

श्लोषालंकराचे एक सुरेख उदाहरण नामदेव गाथेत आढळून येते. एखादा शब्द चरणात पुनःपुन्हा विविध अर्थानी येतो, तेव्हा 'श्लेष, हा अलंकार होतो. पुढील अभंगात 'शिवी' या शब्दाचा असा व्दर्थी उपयोग केलेला आहे. हा संत नामदेवांच्या आत्मचरित्रातील पहिलाच अभंग आहे.

शिंपियाचे कुळीं जन्म माझा झाला । परि हेतु गुंतला सदाशिवी ॥१॥

रात्रिमार्जी सिवी दिवसामजी सिवी । आरणूक जीवीं नोव्हे कदा ॥२॥

सुई आणि सातुळी कामी गजदोरा । मांडिला पसारा सदाशिवीं ॥३॥

नामा म्हणे सिवीं विठोबाची अंगी । म्हणोनियां जगीं धन्य जालो ॥४॥

संत नामदेवांनी या अभंगात 'शिवी' म्हणजे शिवतो व 'शिवाच्या ठायी' या दोन अर्थांनी हा शब्द येथे किती अर्थघन झाला आहे हे स्पष्ट होते. असे संत नामदेवांनी वरील प्रमाणे शब्दालंकाराची उदाहरणे त्यांच्या अभंगात आढळून येतात.

☯ **अर्थालंकार** – 'उपमा' रूपकदि सर्वपरिचित असे ठळक अर्थालंकार नामदेवांच्या काव्यात दिसून येतात. यथासंख्य प्रत्यनीक, परिसंख्या इत्यादी अल्पज्ञात अलंकार त्यात आढळत नाहीत.

'गरूडापारी उभे दाटी वैष्णवांची । उपमा वैकुंठीची पंढरीये ।।' असा उपमेचा नामनिर्देश संत नामदेवांनी केला आहे. अशी अनेक उदाहरणे गाथेत आहेत. रूपकाचे योजनेमुळे नामदेवांच्या कवित्त्वाचे अर्थसौंदर्य अनेक स्थळी विकसित झाले आहे. नामाचा डोंगर, अलंकाराचा वारा, हरिनामाचे भाले, गुरूकृपेचे अंजन, नामाची सांगडी इत्यादी अनेक अर्थपूर्ण 'रूपके' योजिली आहेत. संत नामदेवांनी आपल्या अभंगात 'दृष्टान्त' योजना अतिशय कौशल्याने सढळपणे केली आहे.''देवा आम्ही तुम्हां दिले थोरपन मानी हे वचन सत्य माझे । रोग व्याधि पीडा जनासि नसता । कोण पाचारिता वैद्यालागी ।।'' इत्यादि उपमानाचा उपकर्ष दाखवून उपमेयाचे गुणधिक्य वर्णिले असता 'व्यतिरेक' हा अलंकार होतो. गाथेत काही ठिकाणी हा अलंकार आला आहे. ''अमृताहुनि गोड नाम तुझे देवा ।'' 'निदर्शना' अतिशयोक्ती हे अलंकार क्वचित ठिकाणी आढळतात. 'स्वभावोक्ती' म्हणजे सहज शब्दांकन. अंगभूत साधेपणा हे स्वभावोक्तीचे वैशिष्ट्य संत नामदेवांना आवडले असावे. बाळकृष्णांचे नामदेवकृत वर्णन स्वभावोक्ती अलंकाराचे उदाहरण होय.

''दोंदील दोंदील टमकत चाले । गोजिरी पाउलें घालोनिया ।।
पायी रूणझुण रूणझुणति वाळे । गोपी पाहतां डोळे मननिवे ।।''

संत नामदेवांच्या अभंगकाव्यात आलेले हे सर्व अलंकार पाहिले म्हणजे एक गोष्ट जाणवते. त्यांनी आपले काव्य एकंदरीने अलंकारादि गौण गोष्टांनी नटविण्यापेक्षा त्यात अंतरंग सौंदर्य आण्याचाच अधिक प्रयत्न केला आहे. संत नामदेवांच्या भावसंपन्न व्यक्तिमत्त्वाचे अभिजात सौंदर्य हाच त्यांच्या काव्याचा खरा अलंकार आहे. त्याचा एकेक अभंग म्हणजे उत्कृष्ट 'भावगीत' आहे. भावगीताची भाषा मनोदर्शनाला

साजेशी म्हणजे भावनाकिंत भावदशी अशी आहे. त्यामुळे संत नामदेवांचे काव्य हे प्रकट चिंतन आहे. संत ज्ञानेश्वर – नामदेवादि संत कवी हे मुख्यतः साक्षातकारी संत होते काव्यरचना हा त्यांच्यादृष्टीने ईश्वरभक्तीचा एक पावना प्रकार होता. कीर्तनभक्तीचेच एक अभंग म्हणून संत नामदेवांनी अभंगरचना केली. त्यावर त्यांच्या अतःकरणातील भक्तिभावनेचा ठसा उमटला आहे. 'वाहिली तुजसी दळे स्वामीलागी' प्रेमभक्तीची मधुरता व भावनांची कोमलता यांचा प्रत्यय नामदेवांच्या कवित्वात येतो. तसेच संत नामदेवांच्या रचनेत प्रसाद, ओज, कोमलता इ. काव्यगुण आहेत. संत परंपरेचे सातत्य टिकावे म्हणून संत नामदेवांनीही श्री विठ्ठलाच्या प्रेरणेने आणि संत ज्ञानेश्वरादि संत सखेजनांच्या साहाय्याने आपले चरित्र व आत्मचरित्र आपल्या अभंगवाणीच्या रूपाने लिहून ठेवले आहे. अशाप्रकारे संतनामदेवांच्या अभंगातून त्यांची भाषा साधी, सोपी, व प्रासादिक असून त्यातून काव्याला सौंदर्य प्राप्त करून देणारे रस, अलंकार, काव्यगुण इ. साहित्यिक भाषेतील भाषावैभव त्यांच्या अभंगातून स्पष्ट होतानां जाणवते.

### ३) भक्ती व व्यक्तिविकासाचा चढता आलेख :–

संत नामदेवांची बालभक्ति नामदेवांनी हर प्रयत्नाने अत्यंत तळमळीने त जिज्ञासेने विकसित केली व त्या विकसित भक्तीचा आनंद संत नामदेवांनी उपभोगला आहे. हे त्यांच्या काव्यात दर्शविले आहे. त्यांची भक्ती खुळी, आंधळी असतीतर ते विठ्ठल मंदिरातच भजन करीत बसले असते. त्यांना तत्वज्ञ शास्त्राज्ञ पुराणिकाकडे शोध घेण्याचे काही प्रयोजन पडले नसते. संत ज्ञानदेवाचे भेटीचेही कारण पडले नसते. आत्मीयभावातून विसोबा खेचराकडे गुरुप्राप्तीसाठी गेले तेही कारण पडले नसते. भोळा भाव क्षीण होंत जातो. त्या चैतन्य उरत नाही. चमत्काराशिवाय नमस्कार नसतो. भोळ्या भावात चमत्कार नसतो. लहान वयातही त्यांचे दैवी गुण विकिसत होत गेले. भक्ति प्रसारासाठी त्यांनी अभंगरचना केली कीर्तन हा प्रकार उभारिला व या साधनांनी वयाच्या १४/१५ वर्षापासून त्यांनी जनतेस विठ्ठल भक्तीचे भजनी लावले. त्या वयातच त्यांचे भोवती पंढरपूरचे आसपासचे भागातील अठरापगड जातीचे संत गोळा झाले. नामाचा महिमा ते गुरू प्राप्ती अगोदरच गात होतच. गुरुपदाला वारकरी संप्रदायाला महत्त्व असले तरी ते

तेवढयापुरतेच वारकरीपंथात भक्तीचा विकास प्रत्यंकाने करावयाचा असतो. नाथपंथीयाप्रमाणे गुरूला प्रतिईश्वर मानण्याइतके महत्त्व वारकरी पंथात प्राप्त झालेले नाही. सद्‌गुरूने व ज्ञानदेवांनी नामदेवांना ज्ञानवान केले हे बादरायण मत झाले. वारकरी पंथात संतनामदेव परिपूर्णावस्थेत वयाच्या २०व्या वर्षीच साक्षात्कारी संतपदास पोहोचले. त्यानंतर ज्ञानदेव नामदेवाचे भेटीस पंढरपुरास आले (शके १२१३) ज्ञानदीप लावण्याचा निर्धार पूर्ण केलेले नामदेव प्रथमथः भोळेभक्त होते, या म्हणण्यात काहीच तथ्य उरत नाही. भोळा लुळा म्हणजेच मंदबुद्धीचा मुलगा, त्याचे डोके थापटून कधी ज्ञानवान होतो काय? असा प्रश्न सहज मनात येतो व नामदेवांच्या भक्तीतून व्यक्तिविकासाचा आढावा घेतल्यास संतत्वाची सगळी लक्षणे नामदेवांच्या भक्ती अवस्थेतून साकारताना स्पष्ट होतात.

अध्यात्मजीवनातील विविध अनुभूतींचा आविष्कार करीत असताना संत नामदेवांचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व आपोआपच प्रगट झाले आहे. त्यांची काव्यरचना विलक्षण आत्मनिष्ठ असल्यामुळे त्यांच्या पारमार्थिक व्यक्तिमत्त्वाचे यथा रूपदर्शन त्यांतून होते, ही मोठीच समाधानाची गोष्ट आहे. 'कुटुंब काबाडी सदा कानकोंडा ' अशा एका मामुली प्रापांचिकाने 'परब्रह्म होऊनि ठेलो ।' ही आत्मानंदाची अपूर्व अवस्था कशी प्राप्त करून घेतली, याचा आलेखच संत नामदेवांच्या आत्मनिवेदनपर अभंगवाणीतून पाहायला मिळतो. आपल्या कवित्वात त्यांनी अंतरीचे उमाळे शब्दांकित केले असून, 'चिंतेचे वोणवा. लागला चहुंकडा ।' अशा तीव्र मनोव्यथांचे दर्शन त्यांत घडते. संत नामदेवांची मनोवृती आत्मभिमुख व कमालीची संवेदनक्षम असल्यामुळे त्यांचे अभंग म्हणजे अंतःकरणाचे 'उभड' च आहेत. त्यांची कविता हीच त्यांची आत्मकथा आहे या आत्मकथेतील घटना प्रसंगातून व भावाविष्कारातून परमार्थपथावरील त्यांच्या वाटचालीचे दिग्दर्शन करणे काहीसे अवघड आहे. संत नामदेवांचे भावकाव्य त्यांच्या भावशुब्ध मनाचा उचंबळून आलेला उद्‌गार आहे. उत्कंठा, उत्कटा, अधीरता, आर्तता, अनुताप इत्यादि भावोर्मीच्या प्रवाहात स्वतः नामदेवच त्या त्या वेळी सापडले आहेत. त्यामुळे त्रुटित, स्वतंत्र व स्वयंपूर्ण अशा भावनेचे आविष्करण एकेका अभंगात झाले आहे. या सर्व अभंगात्मक भावचित्रांचा अनुबंध जोडून त्यातून नामदेवांच्या आत्मिक विकासाचा पट स्पष्ट

होताना दिसतो.

संत नामदेवांच्या पारमार्थिक जीवनचरित्रातून त्यांच्या आत्मिक विकासाच्या सहा अवस्था आढळून येतात. पहिली बद्धावस्था असून, सर्पाने गुंडाळलेल्या चंदनाच्या झाडाप्रमाणे अहंकाराने ग्रासलेले मन येथे प्रतीत होते. दुसरी 'त्यांची मुमुक्षुदशा' असून, येथे अनुतापाने उजळलेले। त्यांचे मन परमार्थ साधनांची। जुळवा जुळव करताना दिसून येते. यानंतरची निसरी 'साधक दशा' आहे. या अवस्थेत नामचिंतनाचा दृढनिश्चय करून व चित्तवृत्तीचे स्थैर्य साधून भक्तीचे दृढीकरण करणारे नामदेवांचे व्यक्तिमत्त्व आपणास प्रभावित करते. पण या नंतर या साधकाला 'वंचितदशा' लाभते. आपले यत्न विफल होत आहेत, या शंकेने त्यांच्या मनास वैफल्य ग्रासून टाकते. पायाखालच्या वाळूप्रमाणे प्रपंच तट हातचा निसटला आणि परमार्थानेही कांचनमृगाची भुलावण आरंभिली आहे. या दयनीय दशेतून अनुभवास येणारी निराशा त्यांचे चित्त पोखरते. पण अज्ञानाच्या अंधारात तडफडणाऱ्या त्यांच्या जीवाची ही अंधारी रात्र लवकरच उजळते आणि परमेश्वर प्राप्तीचा अरुणोदय होऊन साधकाला 'सिद्धावस्था' प्राप्त होते. या पुढची आणि आखेरची अवस्था म्हणजे 'जीवनमुक्तावस्था' होय येथे हा सिद्धपुरुष 'उरलोउपकारापुरता' अशी तुकोबाप्रमाणे स्वतःची भूमिका मानतो. या प्रमाणे बद्ध, मुमुक्षु, साधक, वंचित, सिद्ध व जीवनमुक्त अशा सहा अवस्था नामदेवांच्या आध्यात्मिक चरित्रात आढळत असून त्यांतून सतत अत्क्रांत होत जाणारे त्यांचे व्यक्तिमत्व प्रकर्षाने प्रतीत होते. अशा प्रकारे संत नामदेवांच्या आत्मचरित्रात्मक अभंगातून त्यांच्या पारमार्थिक विकासाच्याा सहज प्रकट होणाऱ्या अवस्थांचे प्रगटीकरण होताना दिसते. यातील प्रत्येक अवस्था ही पुढील अवस्थेची पूर्व तयारी असून अखेरच्या अवस्थेत त्यांचे रूपांतर होऊन एक परिपूर्णतेची अवस्था भक्तीच्या माध्यमातू संत नामदेवांनी मांडलेले असून ते त्यांचे प्रांजळ असे आत्मनिवेदन आहे हे स्पष्ट होते.

### ४) आत्मनिवेदनातून साक्षात्कारी आनंदभाव :-

संत नामदेव हे साक्षत्कारी संत होते. ईश्वरभक्तीचे एक साधन या पलिकडे काव्यरचेनेस त्यांच्या मनात अधिक स्थान नव्हते. या दृष्टीने पाहता ते भक्त शिरोमणी ठरलेच आहेत. पण एक श्रेष्ठ भावकवी

त्यांचे महत्त्व म्हणून रतीभरही कमी होत नाही. ''पाषाणकरी तरी पायरीच्या मिषे ।
तुझ्या दारी वसे ऐसे करी ॥''
असे त्याचे आर्त होते. संत नामदेवांच्या ठायी कवी – नरेंद्र व संत ज्ञानेश्वर यांच्या सारखी कवित्वाविषयी डोळस जाणीव असल्याचे दिसत नाही. 'वेडेंवाकुर्डे गाईन । परी तुझा म्हणवीन ॥' हा त्यांचा भाव होता. अभंगाच्या रचनेविषयी त्यांची मते काय होती, हे कळण्यासाठी त्यांच्याच ''अभंगाची कळा नाही मी नेणत । त्वरा केली प्रीत केशीराजे ॥ ''
हा अभंग पाहण्यासारखा आहे. ज्याप्रमाणे धरणीला पर्जन्य, भुंग्याला जसा कुसुमगंध कोकिळ पक्ष्याला जसा आम्रवृक्ष, चक्रवाक पक्ष्याला जसा सूर्य, हंसाला जसे मानससरोवर, तरुण स्त्रीस जसा तिचा कांत प्रिय असतो, तसा संत नामदेवांच्या मनाला विठ्ठल प्रिय झाला होता. ईश्वराभक्तीत कुडीची कुरवंडी करू इच्छिणाऱ्या या भक्ताने आपल्या अभंगात सदा सर्वदा ईश्स्तुतीच गावी हे अधिक नैसर्गिक झाले असते, पण ''रामकृष्ण हरि'' मंत्र जपता जपता, पांडुरंग गाता गाताच त्यांनी देवाला आत्मनिवेदन केले आहे. भक्तिमार्गा वाटचाल करता करता जमलेल्या अनुभवांच्या गाठी त्यांनी मोकळ्या करून दाखविल्या आहेत. पंढरीच्या पतितपावनाला ''ये हृदयीचे ते हृदयी'' घालून हितगुज सांगितले आहे. ''अंतरीचे घावे स्वभावे बाहेरी'' असले हे सांगणे आहे. कळीचे जेवढ्या सहजपणे फूल होते, तेवढ्याच सहजपणे त्या सर्वातून संत नामदेवांचे आत्मचरित्र आकारास आले आहे.

आत्मचरित्राच्या वाचनाने वाचकाला त्या व्यक्तीचे अंतरंग संपूर्णपणे पाहता आले पाहिजे. संतनामदेवांचे आध्यात्मिक अंतरंग जाणून घेण्याच्या दृष्टीने हे चरित्र केवळ अमोल आहे. संत नामदेवांच्या देवभक्तीत प्रारभ होणारा कौटुबिक विरोध, त्यांची व ज्ञानदेवादी भावंडाची प्रथम भेट आणि विसोबा खेचरांकडून मिळालेला गुरूपदेश हा त्यांचा जीवनातील भाग एखाद्या चित्रपटाप्रमाणे आपल्या डोळ्यापुढे उभा राहतो. श्री पांडुरंगाविषयी वाटणारा जिव्हाळा वाणीत पुरेपूर व्यक्त झाला आहे. ''नामयाची वाणी अमृताची खाणी । या वचनाचा प्रत्यय अनेकवेळा येतो. त्यांचे अंतःकरण फुलाप्रमाणे आत – बाहेर सुकुमार असून त्यांच्या

वाणीला कठीणपणा कसा तो ठाऊक नाही. त्यांची अभंगवाणी श्रवणी पडली असता त्यांच्या अंतरंगाचे संपूर्ण दर्शन व्हावे, इतका एकवटपणा त्या दोहोत आहे. कल्पना नव्हे तर भावना हा त्यांच्या काव्याचा आत्मा आहे.

संत नामदेवांच्या आत्मनिवेदनातील प्रामाणिकपणामुळे त्यांच्या जीवनात सहज साक्षात्कारातील "आनंद भाव" त्यांच्या आत्मचरित्रात्मक अभंगातून स्पष्ट होताना दिसतो. सर्व आत्मनिवेदन आपोआप सहजपणे घडलेले आहे, हे म्हटल्यावर त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी शंका उरू नये. संत नामदेवांना श्री विठ्ठल भक्तीची लहानपणापासून आवड होती. मोठ्या लोकांच्या लहानपणाच्या आवडी ह्या मोठेपणा लाभल्यानंतर सोईस्कर रीतीने रचल्या जातात. तसली ही आवड नव्हती. आपल्या भक्तीने घरात माजलेला आपल्या विषयीचा तिटकारा त्यांनी सरळसरळ सांगितलेली आहे. तेव्हा कसलाही आडपडदा न बाळगता त्यांनी हे आत्मचरित्र लिहिले आहे यातून त्यांचे 'सत्यदर्शन' हा त्याचा गुण स्पष्ट होतो. आणि यातच आनंदभाव स्पष्ट होतो.

दामाशेटी, गोणाई यांना नवसासायासाने झालेले हे मूल 'बालभक्त नामदेव' बनते. त्यांना आईचा, वडिलांचा लळा न लागता विठ्ठल – रूक्मिणीचा लळा लागतो. पत्नीच्या नाजूक मिठीत न गुरफटता पांडुरंगाच्या पायांशी ते मिठी मारतात. ऐकांतिक बालभक्ती श्री संत ज्ञानेश्वरादी भावंडांच्या सहवासाने डोळस बनते. विसोबा खेचरांसारखा गुरू लाभतो व अहंकार मावळतो. ज्ञान उजाडते. संत ज्ञानेश्वरांसारख्या ज्ञाननियाच्या राजाला संत नामदेवांचा सहवास हवाहवासा वाटतो.

"नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ॥" म्हणणारे संत नामदेव दोन वेळा उत्तरभारतात प्रवास करून वारकरी संप्रदायाचा जोरकस प्रसार करतात. श्री विठ्ठलमय होऊन श्री विठ्ठला समान होतात. ऊसाच्या पेऱ्यातून दुसरे पेरे निघावे, तशी त्यांची उत्तरोत्तर त्यांच्या आत्मनिवेदनातून साक्षात्कारातील आनंदभावात प्रगती होते. हे स्पष्ट होते. संत नामदेवांचे आत्मचरित्र हे याप्रमाणे आहे. ते परिपूर्ण नसले तरी ज्याप्रमाणे डाळिंब पूर्ण उलले नसले तरी त्यातील बींजाचे सौंदर्य कमी भरत नाही. त्याप्रमाणे संत नामदेवांचे

आत्मचरित्र जेवढे आहे ते सौंदर्यकारक असून त्यातून त्यांच्या आत्मनिवेदनातून सहजपणे साकारलेला साक्षत्कारातील आनंदभाव स्पष्ट होतो म्हणून संत नामदेवांचे आत्मचरित्र हे सौंदर्यकारक आहे असे वाटते.

संत नामदेवांच्या काही वचनावरून तर असे वाटते की, त्यांच्या आयुष्यातील निराशेची काळरात्र संपून गेलेली आहे आणि एका अलौकिक अशा परमानंदाची त्यांना प्राप्ती झालेली आहे. त्यांना विसोबा खेचरांच्या स्वरूपात परमार्थ मार्गावरचा वाटाडया मिळालेला होता त्यामुळे त्यांच्या अंधःकारमय पारमार्थिक प्रवासात एक चैतन्याचा दीप उजळल्याचा आनंद त्यांच्या अनेक अभंगातून प्रकट झालेला आहे. किंबहुना ते अनेक वर्षे जीवमुक्तीची प्रतीक्षा करीत होते ती मुक्ती मिळाल्याचा उत्कट हर्ष ते आपल्या शब्दातून पुन्हा पुन्हा सांगताना दिसतात.

१) ''नामघोष श्रवण सकळां समाधान ।

चुकले जन्ममरण कल्पकोटी ।।'' (६)

२) म्हणोनि मी जालों या संताचा दीन ।

तेणे हरिला सीण जन्मांतरीचा ।। (७)

३) दर्शनेंचि जेथे जीवित्वाची हानी ।

नाठवे परतोनी घराचार ।।

या देवासी भेटी जन्ममरण तुटी ।

मावळली गोष्टी संसाराची ।। (८)

४) जन्ममरणांचे तोडिले सांकडे ।

कैवल्याचि पुढे दावियेलें ।। (९)

५) आतां मज भय नाही पै कोणाचे ।

जन्मणाचे दुःख गेले ।। (१०)

६) जीवनमुक्त केले नामाचे गजरी ।

सेवेसी अधिकारी विनेबाचे ॥ (११)

संत नामदेवांच्या हिंदी रचनेतही हा आत्मनंदाचा विचार आलेला आहे – उदा :

७) भजि भगवंत मुक्ति कै दाता ।

राम कह्या कछु ना बिगरैगी (१२)

अशाप्रकारे वरील वचनांतून संत नामदेवांच्या आत्मनंदातील आत्मसाक्षात्काराची जाणीव त्यांच्या आत्मनिवेदनातून स्पष्ट होते त्यावेळी निराशेच्या गाढ अंधःकारानंतर, व्याकुळतेने ईश्वराला शरण गेल्यावर, सर्व अहंकाराचा समूळ नाश झाला आणि संत नामदेवांना ईश्वरदर्शनाची प्रभातकाळ पाहण्याचे भाग्य लाभले. त्यांना साक्षात्कार झाला. साक्षात्कार म्हणजे ईश्वाचे प्रत्यक्ष दर्शन, अपरोक्ष अनुभूती, त्यांचे बौद्धिक ज्ञान नव्हे. आपण नेहमी साक्षात्कार किंवा प्रत्यक्ष दर्शन हे शब्द वापरतो. त्यामुळे ईश्वराचा अनुभव केवळ डोळ्यांनाच येतो असे वाटण्याचा संभ आहे. परंतू वस्तुस्थिती तशी नाही. संतांचे अनुभव वाचले तर पाचही ज्ञानेंद्रियांना ईश्वराचा अनुभव येऊ शकतो असे दिसून येईल. पण हा अनुभव कसा येतो हा प्रश्न नेहमी उद्भवतो. याचे उत्तर "गुरुदेवरानडे यांनी आपल्या ग्रंथात केले आहे. आपणाला ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन अपरोक्ष साक्षात्कार झाला असे अनेक थोर संत सांगतात तेव्हा ईश्वरांचे ज्ञान होते. अनुभव येतो यात शंकाच नाही. असे अनेक अनुभव संतांच्या लिखाणात आपणाला सापडतात. मग अशा अनुभवाची उपपत्ती कशी लावायची? या अनुभवांना गुरुदेव रानडे यांनी प्रतिभ (Intuitive)अतींद्रिय (Supesensuous) आणि अतंःस्फूर्ती (Centrally initiated) अशी तीन विशेषणे लावली आहेत. त्यावरून त्यांचे स्पष्टीकरण होईल. हे अनुभव मनुष्यामध्ये असलेल्या प्रतिभा नावाच्या शक्तीला (Intuition) येतात. ही शक्ती परतत्त्वाचे ज्ञान करून देण्यास समर्थ आहे" (१३) (नामदेवः आध्यात्मिक चरित्र ज्ञानदीप – ग. वि. तुळपुळे व्दितीय आवृत्ती पान. नं. ७७)

याचीच प्रचीती संत नामदेवांच्या आत्मनिवेदनात्मक काव्यातून येते. "अनंत जन्मीचे विसरलो दुःख । पाहता तुझे मुख पांडुरंग ॥" संत नामदेवांच्या साक्षात्काराचा, त्यांच्या आध्यात्मिक अनुभवांचा विचार

करताना एक गोष्ट लक्षात येते की, त्याच्या अभंगात प्राथमिक अनुभव आले पाहिजेत यात शंकाच नाही. परंतु संत नामदेवांची आध्यात्मिक भूक फार प्रखर असल्यामुळे त्यांचे लक्ष उच्च अनुभवांवरच केंद्रित झाले होते. सामान्य अनुभवांना त्यांनी विशेष महत्त्व दिले नाही. त्यामुळे त्यांचे वर्णनही त्यांच्या अभंगात दिले नाही. संत तुकारामांच्या साक्षात्कारविषयक अभंगातही हेच वैशिष्ट्य दिसून येते. त्यात सामान्य अनुभवाचे वर्णन फारच थोडे सापडते. उच्च अनुभव मात्र भरपूर भरलेले आहेत. संत नामदेवांना रुप, तेज, व अनाहत नाद हे अनुभव विशेषेकरून आले, असे त्यांच्या अभंगावरून दिसते. अमृतरसाचे अनुभवही त्यांना आलेले दिसतात. हे त्यांचे अनुभव श्री विठ्ठलदर्शनाच्या अनुभूतीत स्पष्ट होतात. ते एका अभंगात म्हणतात – "माझा डोळयांनी मी विठ्ठल पाहिला , माझा स्वामी आला, त्याच्या दर्शनाने ब्रह्मादिदेवांना देखील आनंद झाला.कोटी दिवाळ्यादसरे एकदम यावेत, तसा परमानंद त्याच्या दर्शनाने मला झाला, आता मला दुसरे काहीही नको"

"कोटी दिवाळ्या दसरे । आम्हां हेचि झाले पुरे ॥

घरोघरी ओवाळणी । विठ्ठल देखिला नयनी ॥

नामयाचा स्वामी आला । ब्रह्मादिका आनंद झाला ॥"

हा आनंद अर्थात एकट्या नामदेवांनाच झाला, कारण श्री विठ्ठलाचे हे प्रत्यक्ष दर्शन त्यांना एकटयालाच झाले महिपतींनी म्हटले आहे त्याप्रमाणे हे साक्षात्काराचे सुख ज्याचे त्यानेच भोगावयाचे असते, ते दुसऱ्याला देता येत नाही. "ज्याचे त्याने सुख सेवावे । न ये दुसऱ्याला देऊं ॥" परंतु त्या परमानंदाने संत नामदेव इतके अंतःर्बाह्य भरून गेले की, सर्व विश्वच त्यांना आनंदमय वाटू लागले. बाकीची पंढरी आपल्या ऐहिक सुखदुःखातच गढलेली होती. तिला हे भाग्य कोठून लाभणार? ज्यांनी जीव देऊन देव घेतला त्या नादेवांनाच ते लाभले. दुसऱ्या एका अभगात ते सांगतात, – "आकाशात एकाएकी कोटी सूर्याच्या प्रभेसारखी प्रभा झळकली. हा कसला प्रकाश म्हणून विचारता संतानी मला सांगितले की, कमलापती येत आहेत. त्यावेळी मी पाहिले तो गरुडावर आरूढ होऊन नारायण येत होते. गरुडाच्या पंखाच्या आवाजाने दाही दिशा भरल्या

होत्या. भक्तांचे रक्षण करणारे सुदर्शन बरोबर होते, नारायणांनी दोन्ही हातांनी उचलून मला हृदयाशी धरले.''

संत नामदेवांना सर्वत्र देवाने चरण दिसू लागले. त्यामुळे त्यांचे मन उन्मनी अवस्थेत गेले आणि वासना देवाचे चरण पाहण्यात तल्लीन झाली. विषयांचा तिला विसर पडला. या अवस्थेत गुरुशिष्य संबंधही विसरला, शब्दज्ञानाचे कामच उरले नाही. जिकडे पहावे तिकडे, दाही दिशांना, देवाचे रूप भरलेले दिसू लागले अशा या सर्वव्यापी स्वरूपाच्या साक्षात्कारापेक्षाही एकापेक्षा एक अद्‌भूत असावे आध्यात्मिक अनुभव संत नामदेवांना आले. सद्‌गुरूंच्या वचनावर पूर्ण श्रद्‌धा ठेवून त्यांच्या कृपेने मिळालेले नामसाधन घेऊन जो जागा झाला त्याला हा आत्मनंद प्राप्त होतो. असा पुरुष केशवाच्या दर्शनाने केशवच होतो.

अशा या आत्मनुभवाचे (साक्षात्काराचे) जीवनावरील होणारे परिणाम साक्षात्कारी संत आपल्या आनंदभावातून व्यक्त करतात. हेच अनुभवाचे ज्ञान जगाला सांगून त्यांना खरा आनंद प्राप्त करून देणाऱ्याला भक्तिमार्गाला लावणे हे एकच महत्कार्य साक्षात्कार संत करीत राहतात. आत्मोद्‌धारानंतर जगद्‌उधार, असा हा क्रम आहे. संत नामदेवांनीही आत्मोद्‌धारानंतर असेच विश्वोद्‌धाराचे कार्य केले. आत्मोद्‌धारापर्यंत त्याचे संक्षिप्त आत्मचरित्र स्पष्ट होते. त्यानंतर त्यांनी केलेले जगद्‌उद्‌धाराच्या कायाने त्यांचे आत्मचरित्र पूर्णत्वाला येते तो म्हणजे त्यांच्या आध्यात्मिक जीवनाचा उत्तरार्ध आहे. आध्यात्मिक जीवनाच्या या दोन भागांना दुव्याप्रमाणे जोडणारा असा संत नामदेवांचा, आपली कृतार्थता व्यक्त करणारा एक स्फूर्तिदायक अभंग आहे.

''बोलू ऐसे बोल । जेणे बोले विठ्ठल डोले ॥१॥
प्रेम सर्वांगाचे ठायी । वाचे विठ्ठल रखुमाई ॥२॥
परेहूनि परते घर । तेथे राहू निरंतर ॥३॥
सर्वांचे जे अधिष्ठान । तेचि माझे रूप पूर्ण ॥४॥
नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ॥५॥

सर्व सत्ता आली हातां । नामयाचा खेचर दाता ॥६॥" [१४]

अशाप्रकारे संत नामदेवांच्या आत्मनिवेदनातून (आत्मचरित्रातून) साक्षात्कारी आनंद भाव प्रगट झालेला दिसतो.

**५) संत नामदेवांच्या आत्मचरित्राचा आशय :–**

संत नामदेवांच्या आत्मचरित्रात त्यांच्या पूर्वजांविषयी माहिती येते. बालपणी दिसून आलेल्या त्यांच्या वृत्तीचे बेगळेपण, दामाशेटी व गोणाई ह्यांनी केलेले नवससायास, संत नामदेवांचा जन्म, पूर्व जीवनाचा वृत्तांत, अनुताप ,कठोर प्रायश्चित्तु पंढरीस कलेले प्रयाण, लोकनिदा , परमेश्वराशी व्यक्त केलेली शरण्यवृत्ती आदीसंबंधात आत्मनिष्ठा मनाने जेजे जाणवले, ते ते, रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे, मनात येणाऱ्या उलट सुलट विचारांचे आवर्तन वर्णन करताना स्वगत पद्धतीचा अवलंब केला आहे. त्याचप्रमाणे कुटुंबातील अन्य व्यक्तींच्या प्रतिक्रियाही वर्णन केल्या आहेत. या विचारांचे समर्थन करताना पौराणिक कथा व दृष्टांत ह्यांचाही आधार शोधला आहे. विविध व्यक्तींशी समरसून त्यांनी आत्मनिवेदनाच्या मुशीतून त्यांचे विचार लिहिले आहेत. घटनांपेक्षा जाणिवांचे चित्रण करण्यावर त्यांनी भर दिला. आंदोलने, विसंगत वर्तने, आदीचे वर्णन आत्मगत संवादाच्या पद्धतीने केले आहे. आध्यात्मिक ध्यासाचे केंद्र असलेल्या विठोबाशी होणारे संत नामदेवांचे स्वगत, संवाद, लडिवाळपणानं केलेली सलगी, आदी गोष्टी संत नामदेवांच्या आत्मचरित्रातील विलक्षण बोलका व भावपूर्ण असा भाग आहे. ह्या भागात, विठ्ठलाशी स्वतःचे नाते शोधतात. त्यांचे रूप करण्याचा प्रयत्न करतात. संत नामदेव हे कवी असल्याने साहजिकच हे आंतरिक नाते व्यक्त करण्यासाठी प्रतिमा चित्रांची भाषा योजतात.

"नामा शिंपे नामा शिंपे । रोप लाविले केशव बापे ॥१॥

एक उगवली आरडी दरडी । एक वाळूनी झाले कोरडी ॥२॥

एक पुष्प फळाशी आळी । एक कळीच निर्फळ झाली ॥३॥

नामा उगवला केशवद्वारी । न माये आत बाहेरी ॥४॥ " [१५]

हे त्यांच्या वृत्तीचे स्थित्यंतर घडून येत असतानाही त्यांना आपल्या पूर्वजीवनातील स्मृती जाचक होते. ह्या ठिकाणी त्यांनी पौराणिक कथांचे व व्यक्तीचे दाखले देऊन स्वतःची समजूत काढण्याचे प्रयत्न दिसतात. स्वतःचे नत्व, पूर्वजीवनाची गती विसरण्यासाठी लोखंडाला होणारा परिसस्पर्श, गंगेला मिळालेला ओहोळ, काकविष्ठेने उगाळलेला पिंपळ, पतिव्रता झालेली वेश्या, कुश्चळभूमीत उगवलेली तुळस इ. दृष्टांत येतात. श्री विठ्ठलाशी संत नामदेवांचे स्वतःचे जुळलेले अतूट नाते इतरांच्या दृष्टीने कितीही अगम्य व गूढ वाटले तरी ते व्यक्त करण्याचा संत नामदेव प्रयत्न करतात. यातही ही जाणीव संमिश्र स्वरूपाची आहे याचा प्रत्यय येतो. वास्तविक हा प्रत्यय संत नामदेव शोधत आहेत हे लक्षात घ्यायला हवे. कारण आत्मशोधासाठी ते लिहिले जाते. उद्दिष्टाचे असे आहे की, आत्मशोधासाठी ते लिहिले जाते. परमेश्वर आणि भक्त हा संबध संत नामदेवांनी स्वतःच्या तीव्र अनुभूतीची असंख्य रूपे चितारून समृद्ध बनविला आहे. श्री विठ्ठलाशी होणारा सतत संवाद डोळयात साठवलेली त्याची कारुण्यमूर्ती, विठ्ठलाचे स्नेहाळजन, "हे सारे ह्या आत्मनिवेदनातून शब्दांकित झाले आहे. हे अनुभव अलौकिक आहेत. त्यातील जाणिवा अत्यंत विरळ, तरळ व अतींद्रिय अशा आहेत.

"धन्य नामदेव भक्त शिरोमणी । ज्याचा चक्रपाणी वेळाइतु ।।
आनंदघन वोळलासवे अंबरी । वर्षाव सहस्त्रधारी होतो येथे ।।"

भक्तिभावनेचे अष्टसात्त्विक आत्मप्रत्ययी भाषेत वर्णन करण्याचे कार्य संत नामदेवांनी स्वतःचे आत्मचरित्र लिहून केले आहे. ह्या अनुपम सुखासाठी त्यांनी आई, वडील, पत्नी, मुले, ह्यांचे मायापाश दूर लोटले, लौकिक सुखाचा त्याग केला. दुर्धर असा भक्तियोग साधला, संत नामदेवांच्या मनाची ही सहजवृत्तीच होती असे त्यांच्या आत्मचरित्रपर अभंगावरून लक्षात येते. हे साध्य होण्यापुर्वीचा संघर्ष केवळ नामदेवापुरता मर्यादित नाही. तो त्यांच्या कुटुंबाला व्यापून राहिला आहे. आई, वडील, पत्नी यांच्या मनातील संघर्ष संतनामदेवांच्या हळव्या मनाने वर्णन करण्यात ह्या संघर्षाच्या अनेक परिमिती व्यक्त झाल्या आहेत. संतत्वाची भूमिका ही एक संघर्षमय भूमिका आहे. मराठी संतांनी आपल्या आत्मनिवेदनातून ह्या भूमिकेतील

नाट्यमयता व्यक्त केली आहे. संतचरित्रकरांनी मात्र ही भूमिका एकेरीपणे हाताळली असे म्हणणे भाग पडते. म्हणूनही प्राचीन काळातील आत्मनिवेनात्मक लेखनाचे विशेष महत्त्व आहे.

एकीकडे अलौकिक पारमार्थिक सुखांचे आकर्षण, श्री विठ्ठल भक्तीचा विलक्षण ध्यास व दुसरीकडे संसाराची जबाबदारी कौटुंबिक कर्तव्या र्यादा, कुटूबियांची होणारी हेळसांड, अशा दुहेरी काचात सापडलेले नामदेवाचे मन आत्मनिवेदनातून प्रकट होऊ पाहते. नामदेव – गोणाई, गोणाई विठ्ठल, आणि संत मेळाव्यातील त्यांचे परिचित संत, विठ्ठल व गोणाई, दामाशेटी व नामदेव, राजाई – नामदेव, रखुमाई – राजाई, इ. संवाद प्रकरणे संत नामदेवांनी विशेष समरसतेने लिहिली आहेत. या प्रत्यक्ष संवादांच्या पद्धतीने ते आपल्या मानसिक संघर्षाचे गुंतागुंतीचे पदर उलगडण्याचा प्रयत्न करतात. हे संवाद प्रत्यक्षात घडले असतील किंवा नसतीलही. परंतु ह्या संघर्षाला कुंटुबियांच्या नामदेवावरील लोभामुळे अनेक बाजू होत्या हे सहज समजण्यासारखे आहे. वारकरी संत हे प्रापंचिक असल्याने त्यांच्या आत्मनिवेदनातच ही संघर्षाची बाजू वर्णन केली जाते. अर्थात सर्व संतांची मनःप्रकृती सारखी नसल्याने त्याची तीव्रता कमीजास्त प्रमाणात जाणवलेली असणे उघड आहे संत नामदेव, तुकारामाच्या बाबतीत ही आत्मनिवेदना वरील अनेक बाजू वर्णन करितात. संत नामदेव हे एक कविमन असल्याने मनात उचंबळून आलेले भावनांचे कल्लोळ नोदीत राहते. सतत चिंतनाच्या प्रक्रियेतून हे घडून येत असावे. गोणाई, राजाई, दामाशेट, विठोबा व रखुमाई इ. मने ज्या उद्‌गारातून व्यक्त होतात ते उद्‌गार संत नामदेवांनी लिहिले आहेत. संभाव्यतेच्या कसोटीवर त्यांना तपासता येईल. संत नामदेवांच्या जगावेगळ्या श्री विठ्ठल भक्तीच्या छंदामुळे कुटुंबियांना ते पारखे होतात. त्यामुळे हा संघर्ष निर्माण होतो. त्यातून संत नामदेवांचे मन विशेष संवेदनाक्षम असल्याने ते स्वतःबरोबरच इतरेजनांची भावनात्मक घालमेल वर्णन करते. गोणाईच्या मनातील वात्सल्य. वत्सलतेच्या पोटी तिचा भावनात्मक तीव्र आवेग, श्री विठ्ठलाशी नादावलेल्या नामदेवाची तंद्री भंग पावणे, त्याने गोणाईला दोष देणे, नामदेव व गोणाई यामधील समजावणीचा युक्तिवाद, ह्या आत्मनिवेदनामागील लौकिक प्रसंग जरी वर्णन केला नसला तरी तो अध्याहृत आहे. ह्या ठिकाणी दुसऱ्याच्या मनाचा वेध

घेण्याची संत नामदेवांची कुवत व त्यांचे आत्मविश्लेषण सूक्ष्म असल्याचे लक्षात येते. त्यांचे आत्मनिवेदन अनेक दृष्टिकोणांतून स्वतःकडे पाहू इच्छिते. त्यामुळे संत नामदेवांना आत्मशोध घेता आला आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

आत्मचरित्र लेखनात व्यक्ती स्वतःच्या दृष्टीने आजुबाजूच्या जगाचा कानोसा घेत असते. संत नामदेवांनी त्याच पद्धतीने आई, पत्नी, वडील, मुले आणि आपले दैवत विठोबा ह्यांच्या वेगवेगळ्या बाजूंनी स्वतःच्या ध्यासाचे म्हणजेच जीवनाचे स्वरूप शोधण्याचा प्रयत्न केला आहे. गोणाईच्या उद्‌गारातून मातृहृयातील मुलाविषयीचे प्रेम त्यांनी जाणले आहे. विठोबाशी केलेल्या हितगुजातून वात्सल्य, कारुण्य, निग्रह, लडिवाळपणा इत्यादि छटा व्यक्त होतात. आत्मनिवेदनाच्या ह्या अभंगांना संत नामदेवांनी लौकिक जगातील संदर्भ शोधल्यामुळे त्यांना आत्मचरित्राचे स्वरूप येते. आई, वडील, पत्नी, मुलगा हे संदर्भ तर आहेतच पण त्यांनी आपल्या दैवताचा व देवतेचाही संदर्भ कल्पकतेने निर्माण केला आहे. कुटुंबियांच्या मानसिक स्थितीच्या वर्णनातून त्यांनी संसारिकांचे लोभ, आसक्ती वर्णन केले आहे. व भक्तीच्या तत्त्वज्ञानाचे एक अनुभव चित्र स्वतःच्या आत्मशोधाच्या आधारे निर्माण केले आहे.

संत नामदेवांच्या आत्मचरित्रातील एक महत्त्वाचा प्रसंग म्हणजे संत ज्ञानेश्वरादी संतांनी केलेली त्याची परीक्षा होय. ह्या प्रसंगी त्यांनी संतमेळ्याशी घडलेला संवाद लिहिला आहे, संत मुक्ताबाईने केलेली त्यांच्या भाबड्या भक्तीची चेष्टा, मुक्ताबाई व गोराबा यांची भेट, थापटण्याने झालेल्या वेदना आणि गुरूच्या भेटीने झालेले आत्मज्ञान इत्यादी अवस्थांचे नाट्यपूर्ण चित्रण त्यांनी केले आहे. अशाप्रकारचे चित्रण संत नामदेवासारखे कवीच शब्दांकित करू शकतो. कारण गोरोबांनी थापटणे डोक्यावर मारल्यानंतर झालेल्या वेदना, मनाचा उडालेला गोंधळही त्यांनी स्पष्टपणे व्यक्त केला आहे. गुरूपदेशाचा प्रसंग ही वारकरी संतांच्या साधकावस्थेची पर्वणी समजण्यात येते. याठिकाणी संत नामदेवांनी गुरुसेवा, गुरुमहिमा गुरूकृपेचे सुख इ. गोष्टींवर विस्तारपूर्वक लिहून नंतर गुरुभेटीचा व आत्मज्ञानांचा अनुभव वर्णन केला आहे.

"डोळीयाचे डोळे उघडिले जेणे । आनंदाचे लेणे लेवविले ।।"

अशा शब्दांत वर्णन केले आहे. गुरूपदेशानंतर संत नामदेवांनी कवित्व करण्याचा निश्चय केला. त्याला परमेश्वराचा कृपालाभ झाला. येथपर्यंत आत्मचरित्रातील साधकवस्थेतील घटना वर्णन करण्यात आल्या आहेत. यापुढेमात्र आत्मनिवेदन आत्मचिंतनाचे रूप घेते. संतनामदेव चिंतनांच्या स्वरूपात सतत परमेश्वराचे साहचर्य अनुभवीत असल्याने ह्या ठिकाणी वारंवार निर्माण होणारे भक्तीचे उमाळै ज्ञानाची खूण दाखवितात. आत्मसुख प्राप्ती विषयी आर्तोद्‌गार व्यक्त होतात. नवविधा भक्तीचे सारे सोहळे शब्दरूप घेऊ लागतात. श्रवण, कीर्तन, नामस्मरण, संख्यभक्ती, अर्चन, वंदन, चरणसेवा व ईशकृपा इ. च्या स्वरूपात आत्मचिन्तन प्रकट होते. वरील सर्व आविष्कार संत नामदेवांच्या व्यक्तिमनाचे रंग धारण करतात.

गुरुकृपेनंतर केलेल्या आत्मनिवेदनपर अभंगात नामदेवाला आपल्या लौकिक चरित्राविषयी फारसे अर्थपूर्ण काही सांगायचे नसावे. कारण एकप्रकारे विदेही अवस्थेत तो लोकसंग्रहाच्या दृष्टीने जीवन क्रमीत असतो. या अभंगात त्यांच्या कुटुंबियांचे उल्लेख येत नाहीत. घटनांचे वर्णन येत नाही. प्रत्येक अभंग परमेश्वरविषयक अनुभूतीचे भावपूर्ण चित्र रेखीत असतो. हा एका परिणत मनाचा आत्माविष्कार असतो. आत्मचरित्रात्मक लेखन व्यक्तिमनाच्या केंद्राभोवती रुंजी घालणारे लेखन असते. व्यक्तिमनातील आंतरिक ध्यास, भावना मूकपणे सहन केलेली दुःखे, ताण, वैचारिक संघर्ष आदीगोष्टींना त्यात विशेष स्थान असते. संत नामदेवांच्याही अभंगातून हे स्पष्ट होताना दिसते. त्यांचा प्रत्येक अभंग स्वतंत्रपणे लिहिलेला आहे. त्यातून संत नामदेवांच्या मनाचे स्पंदन व्यक्त होत असते. संत ज्ञानेश्वर चरित्राचे अभंग लिहितानाही त्यानी आपले मन अलिप्त ठेवलेले नाही. संत नामदेवांच्या आत्मनिवेदनाने संत मेळ्यातील संत जनाबाई, संत सावतामाळी, संत चोखोबा, संत गोराबा, संत सेनाजी इत्यादी अनेक संतांना त्यांचेकडून स्फूर्ती मिळालेली दिसते. संत नामदेवाइतके आत्मचरित्रपर लेखन ह्या संतांनी केलेले नसले तरी थोडेफार अभंग संतनामदेवांच्या पद्धतीने लिहिल्याचे आढळून येते.

संत नामदेव हे एक उत्कट भावकवीचे मन असल्याने अमूर्त जाणिवांना मूर्त करणे, प्रतिमा चित्रांच्या माध्यमातून भावनुभव गोचर करणे, अलंकरणातून काव्यरूप सजविणे हे सहजपणे करतात. पौराणिक व्यक्तींच्या कथांच्या उपयोजनेने ते पुष्कळदा स्वतःच्या अवस्थांचे रूप करतात. अभिव्यक्तीसाठी त्यांना अडखळून बसावे लागत नाही. परमेश्वराशी हितगुज करतानाही त्यांनी पौराणिक कथा उपयोजून त्यांना वेगवेगळे अर्थ प्राप्त करूने दिले आहेत. त्यातूनच त्यांचे इतरांहून भिन्न अत्यंत उत्कटतेने अनुभविलेले भावविश्व गोचर होते. प्रतिमाचित्रांच्या भाषेतून आत्मकथन करण्याचे सामर्थ्य प्राचीन काळात संत नामदेव, संत जनाबाई, संत बहिणाबाई, संत तुकाराम ह्यांच्यात विशेषत्वाने जाणवते. सुदामकथा ही स्वतःच्या दारिद्र्याची व परमेश्वराच्या उदारतेची भावना व्यक्त करणारी प्रतिमा बनते. किंवा आयुष्याच्या अशाश्वतेची जाणीव व्यक्त करताना सूळी जाणारा चोर, कुऱ्हाडीने तोडला जाणारा वृक्ष, उन्हाने आटणारे पाणी अशा दृष्टितांचा वापर करतात. स्वतःच्या समाधीचा क्षणही त्यांनी पूर्व अनुभवावरून लिहिला आहे.

"कोटी सूर्य प्रभादीप्ती । गगनी झाकली अवचितीं ।।१।।
संत नामयासी सांगती । पैल आला कमलापति ।।२।।
वच्छालागी जैसी धेनु । तैसा धांवे जगजीवनु ।।३।।
गरुडाचे पक्षवाति । राही दिशा आक्रंदती ।।४।।
हरि कंठीची सुमन माळ । सुटूनि आली भूमंडळा ।।५।।
सर्वे चाले सुदर्शन । भक्त करावया रक्षण ।।६।।
उचलोनि दोही बाहीं । नामा धरिला ह्दयी ।।७।। (१६)

वरील समाधी, अनुभूती ही नामदेवांच्या आत्मनिवेदनाची सांगता घडविते. श्री विठ्ठलमूर्ती व त्याभोवती झपाटलेले संत नामदेवांचे आयुष्य यातूनच त्याचे आत्मचित्रण साकार झालेले आहे. त्यांच्या या अभंगातून त्यांच्या जीवनचरित्राचा एका विलक्षण स्तरावरील जीवन आलेखच आहे. आपल्या आत्मचरित्राची सुरुवात संत नामदेवांनी आपल्या जन्मापासून कुलवृत्तांत, जन्मपत्र इत्यादी माहितीतून बालभक्त संत नामदेवांची

भावावस्था श्री पांडुरंगाच्या दर्शनाने कशी बेभान होऊन गेली याचे उत्कट भावचित्र त्यांनी वर्णन केले आहे. त्यानंतर कौटुंबिक संघर्ष, त्यातून गुरूपदेशाची प्रेरणा, त्यानंतर त्यांना ''संतसमागम फळला रे मला' ही नामदेवांची प्रतिक्रियाही अतिशय प्रामाणिक औचित्ययुक्त अशीच आहे. त्यांचे सगळे घाबरलेपण त्यांचा अपेक्षाभंग आणि या अभावित प्रसंगातून कसेबसे जिवनिशी सुटण्याची धडपड हे सगळे अगदी पारदर्शकपणे शब्दांकित झालेले आहे. संत नामदेवांचे एकूण सर्व प्रसंग वेगवेगळ्या प्रतिमांच्या व्दारे अंतःप्रेरणेतून समर्थपणे त्यानी प्रगट केलेले आहेत.

अज्ञानाची झोप डोळा बसणे, सज्जनाच्या गोष्टी कडू होणे, हाती आलेला लाभ गमविणे या संत नामदेवांच्या अपुरेपणाच्या चुका त्यांनीच पांडुरंगाच्या मुखे शब्दबद्ध करून स्वीकारल्या. स्वतःकडे पाहण्याचा परखड दृष्टिकोन यातून दिसून येतो, आणि आत्मचरित्राच्या यशाचे एक गमक उभे राहते. समर्थनाचा वासही येऊ न देता नेटकेपणाने घडविलेले हे 'आत्मदर्शन' आहे. विसोबा खेचराला शरण जाण्याविषयी देवाचा शब्द संत नामदेवांनी शिरोधार्य मानला. ते लगोलग आवंढ्याला येऊन ठेपले. त्यांनतरचा प्रसंग म्हणजे संत नामदेवांच्या आत्मचरित्रातील नाट्याचा कळस आहे. खेचराचे विलक्षण दर्शन, संत नामदेवांची धारदार प्रतिक्रिया आणि त्यांना उत्तर देण्याच्या मिषाने खेचराने जाणवून दिलेले ब्रह्मज्ञान यांचे चित्रण प्रभावी आहे.

खेचराच्या उपदेशाने संत नामदेवांनी बदलेली ज्ञानप्राप्त अवस्था आणि आपल्या जीवनध्येयाचे त्यांनी नसतानाही घेतलेले स्वीकारदर्शन प्रत्ययकारी आहे. कवित्त्वाची कळा जाणत नसतानाही शतकोटी अभंगाची प्रतिज्ञा संत नामदेवांनी केली आणि अभंगांचे छंदःशास्त्रही मनःप्रेरणेने उभे केले. भाबड्या उत्कट बालभक्तापासून जगी ज्ञानदीप लावायला निघालेल्या विष्णुदासापर्यंतचा संत नामदेवाचा जीवन प्रवास म्हणजेच त्याच्या आत्मचरित्रपर अभंगातील भावसौंदर्य होय.

# संदर्भसूची

## प्रकरण पाचवे


१) श्री नामदेव गाथा – शासकीय प्रकाशन पुर्नमुद्रण १९८२, अभंग क्र. १२३२ पान. नं. ५११

२) तत्रैव अभंग क्र. १२३३ पान. नं. ५११

३) तत्रैव अभंग क्र. १२४० पान. नं. ५१३

४) संत नामदेव – डॉ. हे. वि. इनामदार दुसरी आवृत्ती १९९४, पान. नं. २११

५) श्री नामदेवगाथा – शासकीय प्रकाशन पुर्नमुद्रण १९८२, अभंग क्र. ७४०, पान. नं. २८४

६) तत्रैव अभंग क्र. १२४७ पान. नं. ५१५

७) तत्रैव अभंग क्र. १२५४ पान. नं. ५१९

८) तत्रैव अभंग क्र.१२७४ पान. नं. ५२८

९) तत्रैव अभंग क्र. १३५० पान. नं. ५६१

१०) तत्रैव अभंग क्र. १३७० पान. नं. ५६७

११) तत्रैव अभंग क्र. १४७६ पान. नं. ५९८

१२) तत्रैव अभंग क्र. २२८४ पान. नं. ८५४

१३) नामदेव आध्यात्मिक चरित्र व ज्ञानदीप – ग. वि. तुळपुळे, व्दि. आ.१९९५, पान. नं. ७७

१४) श्री नामदेवगाथा – शासकीय प्रकाशन पुर्नमुद्रण १९८२ अभंग क्र. १४९४, पान. नं. ६०३

१५) तत्रैव अभंग क्र. १२३७ पान. नं. ५१२

१६) तत्रैव अभंग क्र.१७७६ पान. नं. ६८७